9 AUG 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

फाइल फोटो




महाराष्ट्र टाइम्सच्या 'बळ द्या पंखांना उपक्रमांतर्गत २०१५ मध्ये विद्यार्थ्यांना जेष्ठ नेते, प्रा. डॉ. एन. डी. पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते चेक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे छायाचित्र.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 AUG 2017
लोकसत्ता

# रंकाळा परिसरातून सात टन कचरा गोळा

## शिवाजी विद्यापीठाची मोहीम

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या** वतीने रविवारी रंकाळा परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेअंतर्गत सुमारे सात टन कचऱ्याचा उठाव करण्यात आला. विशेष म्हणजे यंदा प्लास्टिक कचऱ्याची पूर्णतः स्वतंत्र वेचणी करण्यात आली. मोहिमेत सुमारे १०० किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे आठशे विद्यार्थ्यांनी रंकाळा परिसर लखलखीत केला. रोटरी क्लब ऑफ करवीरच्या सदस्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी इराणी खणीसह मोहिते खण, रंकाळा पदपथ पतौडी उद्यान, संध्या मठाकडील उद्यान तसेच रंकाळ्याच्या बाजूने जाणारा रस्ता या परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. घनकचरा, प्लास्टिक कचरा, काचा व प्लास्टिकच्या बाटल्या विद्यार्थ्यांनी गोळा केल्या. सुमारे तीन तास राबविलेल्या या मोहिमेत सुमारे सात टन कचरा गोळा करण्यात आला. कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने दोन डंपर, एक पाण्याचा टँकर उपलब्ध करून देण्यात आला. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्याकडून झाडू, विळे, टोपल्या, पोती, हातमोजे व मास्क आदींची उपलब्धता करण्यात आली.

### प्लास्टिक कचऱ्याचे स्वतंत्र संकलन

आजच्या मोहिमेत प्लास्टिक कचऱ्याचे स्वतंत्र संकलन करण्यात आले. रोटरीमार्फत पुरविण्यात आलेल्या पोत्यांमध्ये निव्वळ प्लास्टिक कचरा संकलित करून स्वतंत्र वाहनातून तो पुनर्प्रक्रियेसाठी पाठविण्यात आला. रोटरी क्लबच्या वतीने पर्यावरण रक्षणाबरोबरच स्वच्छतेचा संदेश देणारे वाहनही मोहिमेत सहभागी होते.

### इराणी खण - कचऱ्याचे प्रमाण कमी

शिवाजी विद्यापीठाने नियमितपणे रंकाळा परिसरातील इराणी खण परिसरात स्वच्छता मोहिमा राबविल्या आहेत. दहा टन भरेल इतका कचरा केवळ या परिसरातून यापूर्वी उचलण्यात आलेला आहे. मात्र आजच्या मोहिमेत या परिसरातील कचऱ्याचे व प्लास्टिक कचऱ्याचेही प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले.



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने रविवारी रंकाळा परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेअंतर्गत कचरा संकलनात गुंतलेले विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
9 AUG 2017
पुढारी

# विद्यापीठात आज प्राध्यापक, ग्रंथपाल यांच्यासाठी कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : शिवाजी विद्यापीठ बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त दि. ९ रोजी सकाळी ९ ते ५ या वेळेत राजर्षी शाहू सिनेट हॉल येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत ई.रिसोर्सच्या ॲक्सेससाठीचे तसेच ए.पी.आय.बाबतचे मार्गदर्शन केले जाणार आहे. अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर.बहेती उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत विद्यापीठातील प्राध्यापक तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ग्रंथपाल उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 AUG 2011
तरूण भारत

# ग्रंथपालांसाठी आज एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या वतीने बुधवार (दि.९) रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील ग्रंथपाल यांच्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेत ई रिसोर्सच्या ॲक्सेससाठीचे तसेच एपीआय बाबतचे मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर.बाहेती यांना आमंत्रित करण्यात आले आहे, अशी माहिती नॉलेज रिसोर्स सेंटरच्या वतीने पत्रकाव्दारे देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 AUG 2017
पुढारी

# विद्यापीठाच्यावतीने आज साताऱ्यात शहीद स्फूर्ती केंद्राचे उद्‌घाटन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ संचलित शहिद स्फूर्ती केंद्राचे उद्‌घाटन बुधवारी (दि.९) साताऱ्याच्या जिल्हाधिकारी श्वेता सिंघल यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सभागृह, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. सातारा जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप पाटील, प्र.कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सातारा सैनिक स्कूलच्या प्राचार्य मनीषा मिश्रा, कमांडिग ऑफिसर कर्नल देवेन भारद्वाज आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी शहीद कुटुंबीयांचा सन्मान करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 AUG 2017
पुढारी

# विद्यापीठातर्फे आज स्वच्छता अभियान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने बुधवारी (दि. ९) शहरातील प्राचीन वास्तू, पुतळे, रस्ते आणि परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. रोटरी करवीर चॅरिटेबल ट्रस्ट व शिवाजी विद्यापीठ 'एनएसएस'च्या वतीने शहर व परिसर स्वच्छता मोहिमेंतर्गत शहरातील पुतळे आणि विद्यापीठ परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. महाविद्यालय, अधिविभागातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी आवश्यक त्या साहित्यासमवेत उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 AUG 2017 लोकमत

# दीडशे उमेदवारांनी दिल्या मुलाखती

## उमेदवारांची गर्दी : विविध पदांच्या हंगामी भरती प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध बारा हंगामी पदांच्या भरती प्रक्रियेअंतर्गत मंगळवारी सुमारे १५० उमेदवारांनी मुलाखती दिल्या. ही प्रक्रिया तीन तासांहून अधिक वेळ सुरु होती.

विद्यापीठात सुरक्षारक्षक, रोजंदारी शिपाई, ट्रॅक्टरचालक, कुली, सुतार, गवंडी, पंप ऑपरेटर, नळ कारागीर, तारतंत्री, प्रयोगशाळा परिचर, फोरमन, (सुतार, वेल्डर, लोहार, मशिनिस्ट, फिटर, शीटमेटल), आदी पदांच्या ११ महिन्यांच्या भरतीसाठी आस्थापना विभागाकडून मंगळवारी प्रक्रिया राबविण्यात आली. दुपारी साडेबारा ते साडेतीन या वेळेत



संबंधित प्रक्रियेअंतर्गत या विविध पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आणि कागदपत्रांची तपासणी केली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील काही उपकुलसचिवांच्या कक्षांमध्ये आणि राजर्षी शाहू सभागृहात (सिनेट हॉल) प्रक्रिया सुरु होती. त्यामुळे हा परिसर उमेदवारांच्या गर्दीने फुलला होता. दरम्यान, या प्रक्रियेबाबत आस्थापना विभागाचे उपकुलसचिव व्ही. एस. सोयम यांनी सांगितले की, विद्यापीठ प्रशासनातील विविध विभागांना त्यांच्या गरजेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी आस्थापना विभागाकडून या हंगामी पदांची भरती प्रक्रिया राबविली जाते. या प्रक्रियेसाठी प्रशासनाने विविध समित्या नियुक्त केल्या आहेत. या समितीच्या सदस्यांनी मुलाखत व कागदपत्रांच्या तपासणीची प्रक्रिया पार पाडली.

यानंतर आता संबंधित उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार केली जाईल. या प्रक्रियेतून निवड झालेल्या उमेदवारांना रोजंदारी अथवा एकत्रित मानधनावर ११ महिन्यांच्या हंगामी कालावधीसाठी प्रशासनातील विविध विभागांतील सेवेत रुजू केले जाते.

9 AUG 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ

# दूरदर्शनचा बदलता लोगो



भारत सरकारच्या मालकीच्या दूरदर्शनने आपला लोगो 'मानवी डोळा' (ह्युमन आय) बदलण्याचे ठरवले आहे. 'सत्यम शिवम सुंदरम्' हे घोषवाक्य बदलण्याचे मात्र अद्याप निश्चित केलेले नाही. घोषवाक्य बदलण्याबद्दल अद्याप तरी स्पष्टता नाही. महाभारतात युद्धभूमीवरील 'आँखो देखा हाल' संजय हा धृतराष्ट्राला वर्णन करून सांगतो, या आशयावर 'दूरदर्शन' म्हणजेच लांबवर पहाणे असा 'टेलिव्हिजन' या शब्दाशी साध्यर्म असलेले नाव आपण स्वीकारले. दिल्लीच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनचा त्यावेळचा 'व्हिज्युअल कम्युनिकेशन'चा विद्यार्थी देवाशीश भट्टाचार्य यांनी दूरदर्शनचा लोगो तयार केला आणि १५ सप्टेंबर १९५९ च्या पहिल्या प्रसारणापासून हा लोगो प्रसारित होत आहे. टेलिव्हिजनच्या मायावी दुनियेची साक्षीदार असलेली आपली पिढी कधीकाळी देहभान हरपून दूरदर्शनचे कार्यक्रम बघत असे. कृषीदर्शन, हमलोग, बुनियाद, नुक्कड, रामायण, महाभारत, चित्रहार, रंगोली, मालगुडी डेज, वागळे की दुनिया, देख भाई देख, जसपाल भट्टीचा लाफ्टर शो, ऑफीस-ऑफीससारखे कार्यक्रम लोकप्रिय होते. सुरभिने दूरदर्शनला एका नवा आयाम दिला.

दूरदर्शनच्या या लोकप्रियतेच्या काळात खासगी टेलिव्हिजनची स्पर्धा नव्हती. १९९० नंतर आखाती युध्दाचा परिणाम सीएनएन आणि स्टार टिव्ही भारतात आले आणि आता तर देशी आणि परदेशी ८३२ टेलिव्हिजनच्या वाहिन्या उपलब्ध आहेत. दूरदर्शन डेज म्हणजे नोस्टॅल्जिक, रम्य भूतकाळ असे आता आपल्याला वाटत असल्याने, २०१४ पासूनच देश का अपना चॅनेल ही पंचलाइन दूरदर्शन दाखवत आहे. आता बदलत्या भारताशी म्हणजेच नवा भारत आणि नविन पिढी यांच्याशी दूरदर्शनला जोडायचे असल्यास हा जुना लोगो बदलणे आवश्यक आहे, असे प्रसारभारती महामंडळाचे म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी एक लाख रुपयांचे बक्षिस जाहीर केले. दूरदर्शनच्या नव्या लोगोची स्पर्धाही राष्ट्रीय स्तरावर असून सर्वांसाठी खुली आहे. १३ ऑगस्टपर्यंत डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये दूरदर्शनचा लोगो My.gov.in अपलोड करायचे आहे. स्पर्धेच्या अटी, निकष याविशयीचा तपशिल हा या वेबसाइटवर उपलब्ध असून आतापर्यंत २०५९ स्पर्धकांनी आपले लोगो जमा केलेले आहे.

अठ्ठापन्न वर्षांपूर्वी दिल्ली येथे दूरदर्शनचे प्रसारण प्रायोगिक स्तरावर सुरू झाले. केवळ चाळीस किलोमिटरच्या आत-बाहेर ही प्रसारण क्षमता होती. युनेस्कोने आपल्याला यासाठी चाळीस टीव्ही संच भेट दिले होते. १९६५ पासून दूरदर्शनने आपल्या नियमित प्रसारणाला सुरूवात केली. रेडिओच्या अंतर्गत असलेला दूरदर्शन १९६७ ला स्वतंत्र झाला आणि याचवेळी राष्ट्रीय प्रसारणाला सुरूवात झाँली. एशियन गेम्सच्यावेळी १९८२ ला कृष्णधवल असलेला दूरदर्शन रंगीत झाला. आज दूरदर्शनच्या तीस वाहिन्या आहेत. यामध्ये ७ राष्ट्रीय, डीडी इंडिया, आंतरराष्ट्रीय वाहिनीचा समावेश आहे. दूरदर्शन हे पब्लिक सर्व्हिस ब्रॉडकास्टींग म्हणजेच जनसेवा प्रसारण आहे.

दूरदर्शनने भारतीय पीढी घडवली आहे. देशाचा विकास घडवून आणयचा असेल तर टेलिव्हिजनचा उपयोग हा लोककल्याणासाठी करणे आवश्यक आहे. या विचारातून दूरदर्शनची वाटचाल झाली. खासगी टेलिव्हिजनच्या आगमनाने दूरदर्शनला बदलणे भाग पडले असणे तरी व्यावसायिक प्रसारण हा मूळ हेतू नाही. दूरदर्शनसारखे सशक्त माध्यम आपल्या हातात असावे, असेच सरकारला वाटणे हे स्वाभाविक आहे. केवळ लोगो बदलला म्हणजे दूरदर्शन बदलेल असा वरवरचा विचार न करता सकस कार्यक्रम दूरदर्शनने प्रसारित केले तर पुन्हा प्रेक्षक याकडे वळतील आणि नवी पीढीदेखील आपला भारतीय दूरदर्शन ही ओळख विसरणार नाहीत.

चोवीस तास मनोरंजनाच्या नावाखाली खासगी टेलिव्हिजन वाहिन्या अमेरिकन आयातीत कार्यक्रमांचे देशी अवतार भारतीय प्रेक्षकांना दाखवत आहोत. 'कौन बनेगा करोडपती?', 'इंडियन ऑयडॉल', मास्टर शेफ असे अनेक कार्यक्रम आपण दाखवत राहिलो. 'देशी तडका' देवून भव्य-दिव्य सेट्स, दिपवून टाकणारे पाश्चिमात्य वातावरण म्हणजेच टेलिव्हिजनचे कार्यक्रम असे वाटणारी एक नवी पीढी उदयाला आली आहे. महिलांचे पोषाख घालवून विनोदी अंगाने प्रेक्षकांना खिळवणारे पुरूष, कॉमेडी शोमध्ये बघणे आता आपल्या अंगवळणी पडले आहे.नवा भारत, नवी पिढी यांना दूरदर्शन कसे आकर्षित करू शकेल ? याचे उत्तर आता शक्य नसले तरी दूरदर्शन हा देशाचा राष्ट्रीय चेहराच असला पाहिजे ,याबाबत आपण सजग असणे आवश्यक आहे. सत्यम, शिवम, सुंदरम् याचा अर्थ सत्य हीच ईश्वर आहे, ईश्वर सत्य आहे या आंशयाची पंचलाइनदेखील बदलण्याची शक्यता वाढली आहे. कोल्हापूरचे सुपूत्र निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबागदार यांनी स्वच्छ भारत मोहिमेसाठी तयार केलेला लोगो हा अशाच प्रकारच्या राष्ट्रीय स्पर्धेतून मानकरी ठरला आहे. चलनावर देखील त्यांनी रेखाटलेला गांधीजीचा चष्मा आणि त्यातील स्वच्छ भारत हा संदेश स्वीकारण्यात आला, ही बाब आपल्यासाठी गौरवशाली आणि अभिमानाची गोष्ट आहे. तसाच बहूमान पुन्हा कोल्हापूरला मिळेल अशी अपेक्षा यावेळी करायला हरकत नाही.

• डॉ. निशा मुडे-पवार

9 AUG 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विविध अभ्यासक्रमांत शिक्षणाची संधी : तंत्रशिक्षण परिषदेची मार्गदर्शक योजना

# केआयटी-सीओईपीत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अभियांत्रिकी महाविद्यालय (केआयटी) आणि शासनाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (सीओईपी) यांच्यामध्ये मार्गदर्शक या योजनेअंतर्गत सामंजस्य करार झाला. याअंतर्गत 'केआयटी'च्या विद्यार्थ्यांना 'सीओईपी'मध्ये शिक्षणाची संधी मिळणार आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटी) मार्गदर्शक या योजनेमध्ये ठरावीक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांना राज्यातील इतर अभियांत्रिकी महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिकार दिले आहेत. त्यानुसार राज्यातील इतर अभियांत्रिकी महाविद्यालयेसुद्धा गुणवत्ता व कौशल्य याबाबतीत विकसित होतील. या करारामुळे 'केआयटी'च्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील पाच वर्षे सीओईपी



कोल्हापुरातील केआयटी कॉलेज आणि पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्यात सामंजस्य करार झाला. यावेळी केआयटीचे संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, एम. एस. चव्हाण, वाय. एम. पाटील, सीओईपीचे संचालक डॉ. बी. बी. आहुजा, उपसंचालक बी. एन. चौधरी, एस. ए. मेश्राम, एम. एस. सुतावने उपस्थित होते.

कटिबद्ध राहणार आहे. अनेक अभिनव व नावीन्यपूर्ण गोष्टींचा या करारांतर्गत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गॅप ॲनॅलिसिस, सॉट ॲनॅलिसिस, विशेष वर्गासाठी अध्यापन, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आणि क्रेडिट ट्रान्स्फर या संकल्पनांतर्गत केआयटीतील विद्यार्थी विशिष्ट अभ्यासक्रमासाठी 'सीओईपी'मध्ये शिक्षण घेऊ शकतील. तेथील तज्ज्ञ प्राध्यापक त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या करारावेळी 'सीओईपी'चे डायरेक्टर डॉ. बी. बी. आहुजा यांनी कराराची माहिती दिली.

उपसंचालक बी. एन. चौधरी, एस. ए. मेश्राम यांनी स्वागत केले. ज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. एस. सुतावने यांनी पुढील पाच वर्षांचा आराखडा सांगितला. यावेळी 'केआयटी'चे संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, एम. एस. चव्हाण, वाय. एम. पाटील उपस्थित होते.

### संयुक्त संशोधन प्रकल्प

सीओईपीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांबरोबर 'केआयटी'च्या विद्यार्थी व प्राध्यापकांना संयुक्त संशोधन प्रकल्प राबविता येतील. त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन लाभणार आहे, असे 'केआयटी'चे संचालक डॉ. व्ही. कार्जिन्नी यांनी सांगितले. ते म्हणाले, केआयटीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठीच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. पुढील वाटचालीमध्ये ध्येय व उद्दिष्टांपासून ते महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सीओईपी ही केआयटीची मार्गदर्शक म्हणून सोबत असणार आहे. हा करार पुढील पाच वर्षांसाठी राहणार आहे. या कराराबद्दल केआयटीचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली व इतर संचालकांचे मार्गदर्शन लाभले.

9 AUG 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डीकेटीईच्या विद्यार्थिनीस ४८ लाखांची शिष्यवृत्ती

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**

येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲन्ड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूटमधून बी.ई. मेकॅनिकल पदवी प्राप्त क्षितिजा गणेश जाधव या विद्यार्थिनीस समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणेकडून इंग्लंड येथे उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी ४८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.

सप्टेंबर २०१८ ला ही विद्यार्थिनी इंग्लंड येथील 'न्यूकॅस्टल' या नामांकित विद्यापीठामध्ये 'मास्टर ऑफ सायन्स इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग' या दोन वर्षे अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंड येथे रवाना होत आहे. 'न्यूकॅस्टल विद्यापीठ' हे मान्यता प्राप्त जगप्रसिद्ध विद्यापीठ आहे. पदव्युत्तर शिक्षणामध्ये 'रोबोटिक्स व व्हेईकल ड्राईव्हज ॲण्ड डायनॅमिक्स' या विषयावर संशोधन करण्याचा तिचा मानस आहे.

या विद्यार्थिनीने आय.इ.एल.टी.एस. या परीक्षेत यश प्राप्त केले आहे. तिची शैक्षणिक गुणवत्ता तसेच आर्थिक परिस्थिती या सर्वांची पडताळणी करून तिची या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. तिने विविध राष्ट्रीय सेमिनार्समध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. कोणत्याही प्रकारची शैक्षणिक फी व इतर खर्च न करता या विद्यार्थिनीला परदेशामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. या परीक्षेत यश मिळविण्यासाठी डीकेटीईमध्ये करिअर गाईडन्स सेल मार्फत विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व लेक्चरचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते. या लेक्चरमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रेरणा मिळते तसेच डीकेटीईमध्ये उपलब्ध असलेली सॉफ्टवेअर्स व तंत्रज्ञानाचा उपयोग या विद्यार्थ्यांना परीक्षेत यश मिळविण्यासाठी झाला.

क्षितिजा जाधवने परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्तीच्या सर्व अटींची पूर्तता करून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. या शिष्यवृत्तीअंतर्गत तिला शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, ये-जा खर्च, पुस्तकांचा खर्च व इतर आनुषंगिक असा सर्व खर्च महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून करण्यात येणार आहे.

क्षितिजा जाधव हिला डीकेटीईचे डायरेक्टर प्रा.डॉ.पी. व्ही. कडोले, डे.डायरेक्टर प्रशासकीय प्रा.डॉ.यू. जे. पाटील, डे.डायरेक्टर शैक्षणिक प्रा.डॉ.एल. एस. आडमुठे, विभागप्रमुख डॉ.व्ही. आर. नाईक यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. या यशाबद्दल डीकेटीई संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे तसेच इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा.डॉ.पी. व्ही.कडोले व सर्व विभागप्रमुखांनी तिचा व तिच्या कुटुंबीयांचा सत्कार केला.



**इचलकरंजी : उच्च शिक्षणासाठी इंग्लड येथे निवड झाल्याबद्दल क्षितिजा गणेश जाधव हिचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा.डॉ.पी. व्ही. कडोले आदी.**